नि. फौ. ख. क्र.७५/२०२०
सरकार विरुध्द मिर्झा जावीद बेग
निशाणी क्र. ३३ वर

आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.एच.काझी यांच्या मार्फत निशाणी क्र.३८ वरील आदेशान्वये साक्षीदार क्र.२ सय्यद अझरअल्ली सय्यद दादु, यांचा शपथेवरील उलटतपास सुरू.

०४. हे खरे नाही की, अरबाज, अहेमद, रिजवान आणि शिराज हे माझे नातेवाईक आहेत. हे खरे नाही की, ते माझ्या शेजारी राहतात. हे खरे आहे की, शब्बाना, मुजीद, तौफीक, फसीउद्दीन आणि बाशिद यांचे घर माझ्या घराशेजारी आहेत. ज्या मातीचा ट्रक आणला होता, त्याच्या मालकाचे नाव मला माहिती नाही. त्या ट्रॅक्टरवर सय्यद अरबाज अल्ली काम करतो. त्या ट्रॅक्टरचा क्रमांक मी सांगु शकत नाही. ट्रॅक्टरमधील माती ही आरोपी व माझ्या घराच्या दरम्यान विवादीत जागेवर टाकण्यात आली. हे खरे नाही की, अजुनही त्या ठिकाणी माती पडलेली आहे. घटनेनंतर तिन ते चार महिने ती माती तिथेच पडलेली होती. ज्यावेळी माती टाकण्यात आली त्यावेळी मी घरात हजर होतो. मी ज्यावेळी बाहेर आलो त्यावेळी माझ्या वडीलांचे डोके फुटलेले होते. ती घटना अंदाजे अर्धा ते पाऊणतास चलली. हे खरे आहे की, भांडण सुरू असताना अंदाजे पाच पन्नास लोक जमा झाले होते. हे खरे नाही की, ग्रामपंचायतीने विवादीत जागा आरोपी क्र.१ च्या मालकीची असल्याचे घोषीत केले होते. हे खरे आहे की, आरोपीने त्या जागेवर कचरा व लाकडे टाकली होती.

०५. मला मारल्यामुळे झालेल्या जखमेतुन रक्त निघाले होते आणि माझ्या टी-शर्टला लागले होते. मारहाण झाल्यानंतर मी आणि माझे वडील सर्वप्रथम पोलीस ठाण्यात गेलो. दवाखाण्यात उपचारासाठी पोलीसांनी पत्र दिले नव्हते. दवाखाण्यात रात्री अंदाजे ०८.०० वाजेपर्यंत उपचार चालला. पोलीस ठाण्यात अंदाजे ०९.०० वाजताच्या दरम्यान गेलो होतो. हे खरे आहे की, पोलीस ठाण्यात परत गेल्यावर माझ्या आणि वडीलांच्या अंगावर रक्ताचे डाग असलेले कपडे होते. पोलीसांनी माझे व वडीलांचे कपडे पंचनामा करुन घेतले होते. दवाखाण्यात उपचार करताना ते कपडे आमच्या अंगावर होते. हे खरे आहे की, दुस-या दिवशी पंचनामा करुन पोलीसांनी आमचे कपडे जप्त केले. अफरोज आणि आकीब हे माझे सख्खे भाऊ आहेत. ते दोघेही भांडण सुरु असताना माझ्या वडीलांचे डोके फुटल्यानंतर तेथे आले होते. हे खरे आहे की, मारहाण झाल्यामुळे

रक्त निघाल्यामुळे मला आणि माझ्या वडीलांना कमजोरी येऊन चक्कर आल्यासारखे वाटत होते. घटनास्थळ पंचनाम्याच्या वेळी मी व माझे वडील हजर नव्हतो. घटनेच्या अर्धा तासानंतर मी लोखंडी फुकणी, दगड आणि लाकुड बघितले होते. घटनेनंतर मी पोलीसांना बोलविले नाही. माझया वडीलांना धर्माबादच्या ग्रामीण रुग्णलायात टाके पडले. हे खरे नाही की, आरोपीनी कधीही माझ्या वडीलांना मारहाण केली नाही. हे खरे नाही की, विवादीत जागेवर माती टाकल्याने भांडण झाल्याचे मी खोटे सांगतो आहे. हे खरे नाही की, आम्हीच आरोपींना मारहाण केली व त्यांनी आमच्या विरुद्ध पोलीसात तक्रार करु नये म्हणुन स्वत:च त्यांच्याविरुद्ध तक्रार दिली. हे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना त्यादिवशी घडली नाही.

०६. मी पोलीसांना सांगितले होते की, फुरखान याने मला पोटावर, छातीवर, हातापायाने तर आरोपी क्र.३ हीन माझ्या वडीलांना दगडाने मारले त्याचबरोबर आई-बहिणीवर घाणेरडया शिव्या दिल्याचे सांगितले होते. हे खरे नाही की, हा मजकुर पोलीसांनी लिहुन घेतला नाही. हे खरे नाही की, लोखंडी फुकणी, दगड आणि लाकुड कुठुन कसे आणले, हे मला माहिती नाही. साक्षीदार सांगतो की, घटनास्थळावरुन पोलीसांनी ते जप्त केले. मी पोलीसांना मला झालेली मारहाण व त्याचे निशाण दाखवले होते. हे खरे नाही की, माझ्या वडीलांनी आरोपींविरुद्ध खोटी केस केली.

उलटतपास-पुर्ण

फेरतपास-काही नाही.

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

**Sd/-**

**(**एस**.**ए**.**हरणे**)**

दिनांक**:** ०९**.**०७**.**२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी**,** धर्माबाद**.**

नि. फौ. ख. क्र.७५/२०२०
सरकार विरुध्द मिर्झा जावीद बेग
निशाणी क्र. ३५ वर

आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.एच.काझी यांच्या मार्फत निशाणी क्र. ३८ वरील आदेशान्वये साक्षीदार क्र.३ सय्यद अहेमद सय्यद महेबुब, यांचा शपथेवरील उलटतपास सुरू.

०३. मी शिक्षण घेतो. ज्या मातीचा ट्रक आणला होता, त्याच्या मालकाचे नाव मला माहिती नाही. त्या ट्रॅक्टरवर सय्यद अरबाज अल्ली ड्रायव्हर म्हणुन काम करतो. त्या ट्रॅक्टरवर मी ड्रायव्हर नाही. मी पोलीसांना त्या ट्रॅक्टरचा क्रमांक सांगितला नव्हता. हे खरे आहे की, मी ट्रॅक्टर ड्रायव्हर अथवा मालक नसताना मला आरोपी क्र.१ ने माती आणण्यास सांगितले म्हणुन मी माती आणुन टाकली. हे मला माहिती नाही की, ती जागा नेमकी कोणाच्या मालकीची आहे. त्या जागेसंदर्भात वादविवाद चालु होता. हे खरे आहे की, ट्रॅक्टर मधील दीड ब्रॉस माती मी आरोपी क्र.१ च्या सांगण्यावरुन त्या जागेवर टाकली. हे खरे नाही की, त्या जागेवर आरोपी क्र.१ चे कचरा, दगड व लाकडे पडलेले होती. हे खरे आहे की, फिर्यादीने मला जागेवर माती टाकु नको असे सांगितले होते. हे खरे आहे की, आरोपी क्र.१ व फिर्यादी यांच्यादरम्यान जागेवरुन भांडण सुरु झाले. हे खरे नाही की, भांडणाचा आवाज ऐकुण तेथे पाच पन्नास लोक जमा झाले. साक्षीदार सांगतो की, भांडण संपल्यानंतर लोक जमा झाले.हे खरे आहे की, माझे फिर्यादीशी नातेसंबंध आहे. ते भांडण अंदाजे २ मिनिट चालले.

०४. हे खरे आहे की, मी घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन घटनास्थळ पंचनाम्यावर पंच आहे. पोलीसांनी मला पंचनामा वाचुन दाखवला. पोलीसांनी पंचनाम्यामध्ये दीड ब्रास मातीचा उल्लेख केला होता. घटनास्थळावर केर-कचरा, दगड व लाकडे नसल्याचे पंचनाम्यामध्ये पोलीसांनी लिहीले. हे खरे नाही की, मी पंचनामा वाचला नाही व पोलीसांनी मला वाचुन दाखविला नाही केवळ फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी न वाचता त्यावर सही केली. पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा करतेवेळी जागेवरुन लोखंडी फुकणी, दगड आणि काठी जप्त केली. पंचनामा घटनेच्या दुस-या दिवशीच करण्यात आला. हे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने माती आणण्यास सांगितल्याने माती टाकताना

फिर्यादीचे त्याच्याशी भांडण झाले व त्या भांडणात आरोपीनी फिर्यादीला मारहाण केल्याचे मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, घटनास्थळावर केरकचरा दगड व लाकडे नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे आहे की, पोलीस पंचनामा करण्यासाठी आले असता पोलीसांची सांगण्यावरुन लोखंडी फुकणी, दगड आणि लाकुड आरोपीने घरातुन  आणुन दिले. फिर्यादी माझा जवळचा नातेवाईक असुन देखील त्याच्यासोबत पोलीस ठाणे आणि दवाखाण्यात गेलो नाही.

उलटतपास-पुर्ण

फेरतपास-काही नाही.

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

**Sd/-**

(एस.ए.हरणे)

दिनांक: ०९.०७.२०२४ — प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.

नि. फौ. ख. क्र.७५/२०२०
सरकार विरुध्द मिर्झा जावीद बेग
निशाणी क्र. ३७ वर

आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.एच.काझी यांच्या मार्फत निशाणी क्र. ३८ वरील आदेशान्वये साक्षीदार क्र.४ सय्यद रिजवान ऊर्फ शाहीन सय्यद सादक घौरी, यांचा शपथेवरील उलटतपास सुरू.

०२. मी दहावी पर्यंत शिकलो आहे. पोलीसांनी माझे बयाण घटनेच्या दुस-या दिवशी घेतले होते. मी पोलीसांना ट्रॅक्टरचा नंबर सांगितला नव्हता. ट्रॅक्टर माझ्या नातेवाईकाचे होते त्याचे नाव मला आता आठवत नाही. मी माती आणल्याचे अहेमदला माहिती होते किंवा नाही हे मला माहिती नाही. साक्षीदार सांगतो की, आम्ही तेथुन जात असताना अहेमद तेथे उभा होता. मी तेथे माती टाकली होती. मी फिर्यादीचा दुरचा नातेवाईक आहे. ड्रायव्हर मी होतो तरी देखील ट्रॅक्टर अरबाज चालवत होता. त्या जागेबाबत फिर्यादी आणि आरोपी क्र.१ चा वाद असल्याचे मला माहिती नव्हते. हे माझ्या लक्षात नाही की, ज्या ठिकाणी माती टाकली त्या ठिकाणी आरोपींचा केरकचरा, दगड, पत्रे आणि लाकडे होती. हे खरे आहे की, माती टाकण्याच्या कारणावरुन दोघांमध्ये भांडण सुरु झाले. संपुर्ण भांडण अंदाजे अर्धा-पाऊणतास चालले. हे खरे नाही की, भांडण सुरु झाल्याबरोबर पन्नास-साठ लोक तेथे जमा झाली. साक्षीदार सांगतो की, भांडण सोडवण्यासाठी आम्ही जेंव्हा गेलो त्यावेळी लोक जमा झाली. भांडण सुरु झाल्यानंतर १५-२० मिनिटांनी लोक आले.

०३. हे खरे आहे की, लोखंडी फुकणीने मारल्याने फिर्यादीचे डोके फुटुन त्याच्या कपडयावर रक्ताचे डाग पडले होते. मी फिर्यादीच्या सोबत पोलीस ठाण्यात व दवाखाण्यात गेलो नव्हतो. अफरोज आणि आकीब हे भांडण संपण्याच्या वेळेला आले. त्यांनी फिर्यादी व त्याच्या जखमी मुलाला कोणाच्या ऑटोत पाठवले त्याचे नाव मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की, फिर्यादी व आरोपी क्र.१ चे जागेबाबत वाद असताना ग्रामपंचायतीने ती जागा आरोपी क्र.१ ची असल्याबाबत घोषणा केली होती. हे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादी व त्याचा मुलगा अजहरला मारहाण केली व त्याचे डोके फोडले हे मी खोटे सांगत आहे. मला माहिती नाही की, आजही त्या ठिकाणी माती

पडलेली आहे किंवा नाही. हे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेली सर्व घटना खोटी आहे. हे खरे नाही की, मी फिर्यादीचा नातेवाईक असल्याने फिर्यादीशी संगणमत करुन आरोपीला त्रास देण्याच्या उद्देशाने खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास-पुर्ण
फेरतपास-काही नाही.

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

**Sd/-**

(एस.ए.हरणे)

दिनांक: ०९.०७.२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.